



दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १२५ । किंमत - २ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार । २४/०५/२०२६ । पाने -६




# तिगावमध्ये दुर्दैवी दुर्घटना

## खाणीत साचलेल्या पाण्यात बुडून दोन सख्या भावांचा मृत्यू

### संतप्त ग्रामस्थांचा प्रशासनाला थेट सवाल



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील तिगाव परिसरात घडलेल्या अत्यंत हृदयद्रावक घटनेने संपूर्ण तालुक्यात शोककळा पसरली आहे. खाणीत साचलेल्या पाण्यात बुडून दोन सख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने तिगावसह संपूर्ण तळेगाव गट हादरून गेला आहे. या घटनेनंतर परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

परिसरात सुरू असलेल्या खाणी व स्टोन क्रेशरमुळे मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून, त्यामध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत आहे. हे पाण्याने भरलेले खड्डे आता अक्षरशः मृत्यूचे सापळे बनले असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे अशा ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या सुरक्षा उपाययोजना नसल्याचा आरोप होत आहे. ना इशारा देणारे सूचना फलक, ना संरक्षण भिंती, ना सुरक्षा जाळी त्यामुळे परिसरातील नागरिक, विशेषतः लहान मुले आणि युवकांच्या जीवाला सतत धोका निर्माण झाला आहे.

या घटनेनंतर ग्रामस्थांनी प्रशासन, महसूल विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच लोकप्रतिनिधींना थेट जाब विचारण्यास सुरुवात केली आहे. अनेक वर्षांपासून नागरिकांकडून सातत्याने तक्रारी केल्या जात असतानाही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. ग्रामस्थांमधून आता तीव्र संताप व्यक्त होत असून अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**वारंवार तक्रारी करूनही कारवाई का होत नाही?**

खाण व क्रेशर मालकांना नेमका वरदहस्त कुणाचा आहे? सामान्य नागरिकांच्या जीवाची किंमत प्रशासनासाठी नाही का? अशा संतप्त प्रतिक्रिया आता उघडपणे समोर येऊ लागल्या आहेत. तिगाव आणि तळेगाव गटातील नागरिकांनी एकत्र येत बेकायदेशीर खाण आणि क्रेशरविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास तीव्र आणि उग्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. परिसरातील अनेक गावांमध्ये खाण व क्रेशरमुळे वाढते धूळप्रदूषण, रस्त्यांची दुरवस्था, भूजल पातळीवरील परिणाम, पिण्याच्या पाण्याची समस्या आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत. मात्र प्रशासनाकडून केवळ कागदोपत्री कारवाई केली जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना शरद गोर्डे यांनी संतप्त भावना व्यक्त करत म्हटले की, अजून किती निष्पापांचे बळी गेल्यावर प्रशासन जागे होणार? दोन सख्या भावांचा मृत्यू अत्यंत वेदनादायी असून हा केवळ अपघात नसून प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा बळी आहे. परिसरातील बेकायदेशीर खाणी आणि क्रेशरमुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत. वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकारी गप्प का आहेत? खाण व क्रेशर मालकांना वरदहस्त कुणाचा आहे, याची सखोल चौकशी झाली पाहिजे. अन्यथा तळेगाव गटाच्या वतीने तीव्र आणि उग्र आंदोलन उभारले जाईल.

दोन निष्पाप भावांचा मृत्यू हा केवळ एका कुटुंबावर कोसळलेला दु:खाचा डोंगर नसून, संपूर्ण संगमनेर तालुक्यासाठी हादरवून टाकणारी घटना ठरली आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, की आणखी एखाद्या दुर्घटनेची वाट पाहणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या**

- बेकायदेशीर खाणी व क्रेशर तात्काळ बंद करण्यात यावेत
- संबंधित अधिकारी व मालकांवर कठोर कारवाई करावी
- दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा
- मृतांच्या कुटुंबीयांना मोठी आर्थिक मदत जाहीर करावी
- खाणी परिसरात सुरक्षा उपाययोजना कराव्यात
- तालुक्यातील सर्व खाणींची उच्चस्तरीय चौकशी व्हावी

# पुन्हा इंधन दरवाढ



मुंबई (वृत्तसंस्था)

देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा मोठी वाढ करण्यात आली असून, गेल्या ९ दिवसांतील ही तिसरी दरवाढ ठरली आहे. मुंबईत पेट्रोलच्या दरात ८७ पैशांची वाढ होऊन ते १०८.४९ प्रति लिटरवर पोहोचले आहे. तर डिझेल ९१ पैशांनी महागले असून त्याचा दर ९५.२० प्रति लिटर झाला आहे. सततच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिक, वाहनचालक आणि वाहतूक व्यवसायिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

यापूर्वी याच आठवड्यात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सरासरी ९० पैसे प्रति लिटर वाढ करण्यात आली होती. त्याआधी काही दिवसांपूर्वीच इंधनाच्या दरात तब्बल ३ प्रति लिटर वाढ झाली होती. सलग होत असलेल्या या वाढींमुळे महागाईचा आणखी भडका उडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाल्यामुळे देशांतर्गत इंधन दर वाढले असल्याचे तेल कंपन्यांकडून सांगितले जात आहे. इराण आणि अमेरिकेमधील तणावपूर्ण परिस्थितीमुळे जागतिक तेल बाजार अस्थिर झाला आहे. युद्धजन्य परिस्थिती निर्माण होण्यापूर्वी कच्च्या तेलाचे दर सुमारे ७० डॉलर प्रति बॅरल होते. मात्र आता हे दर १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले आहेत.

यामुळे भारतातील तेल विपणन कंपन्यांवर मोठा आर्थिक दबाव निर्माण झाला आहे.

# मुख्यमंत्री 'वंदे भारत'ने शिर्डीत



युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करण्याचे केलेले आवाहन लक्षात घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंबई ते शिर्डीचा प्रवास वंदे भारत एक्सप्रेसने केला. त्यांच्या या प्रवासाची राज्यभरात चर्चा सुरू झाली असून, पर्यावरणपूरक आणि सोयीस्कर प्रवासाला प्राधान्य देण्याचा संदेश त्यांनी दिला आहे.

शिर्डीकडे रवाना होताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवण्याची गरज अधोरेखित केली. वाढती वाहतूक, इंधनाचा वाढता वापर आणि पर्यावरणावरील परिणाम लक्षात घेता नागरिकांनी रेल्वे, बस यांसारख्या सार्वजनिक साधनांचा अधिक वापर करावा, असे त्यांनी म्हटले. वंदे भारतसारख्या आधुनिक रेल्वे सेवेमुळे प्रवाशांना जलद, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाची सुविधा मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या कृतीकडे प्रतीकात्मक संदेश म्हणून पाहिले जात आहे. राज्यातील नागरिकांनी शक्य तिथे सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय निवडल्यास वाहतूक कोंडी, प्रदूषण आणि इंधन खर्च कमी होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर मुख्यमंत्री स्वतः सार्वजनिक वाहतुकीचा वापर करत असल्याने याचा सकारात्मक परिणाम नागरिकांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेल टंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत असून विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत. खरीप हंगामाच्या तोंडावर पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरू असताना ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळत नसल्याने अनेक ठिकाणी शेतीची कामे ठप्प झाली आहेत. वाशिम, बुलढाणा, हिंगोली, जळगाव आणि जालना जिल्ह्यात पेट्रोल पंपांवर रात्रीपासूनच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून अनेक शेतकऱ्यांना ट्रॅक्टरवरच रात्र काढावी लागत आहे.

### शाळा १५ जून नव्हे २६ जूनपासून सुरु होणार?

मुंबई (वृत्तसंस्था)

हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार सध्या संपूर्ण विदर्भात सूर्य अक्षरशः आग ओकत आहे. उन्हाचा पारा सातत्याने वाढू लागल्याने विदर्भातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या वाढत्या तापमानाचा आणि उष्णतेच्या लाटेचा थेट फटका शालेय विद्यार्थ्यांना बसू नये, म्हणून राज्य सरकारकडून एक मोठा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. १० जूननंतरही विदर्भातील उष्णतेची लाट अशीच कायम राहिली तर नेहमीप्रमाणे १५ जून रोजी सुरू होणाऱ्या शाळा यंदा थेट २६ जून रोजी सुरू करण्याबाबत सरकार विचार करत असल्याची माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली आहे. या संदर्भात शालेय शिक्षण विभाग लवकरच एक महत्त्वाची बैठक घेऊन परिस्थितीचा सविस्तर आढावा घेणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

# अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा

## संगमनेरसाठी ४ कोटी ३७ लाखांची मदत मंजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले होते. या नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा देत संगमनेर तालुक्यासाठी तब्बल ४ कोटी ३७ लाखांची नुकसानभरपाई मंजूर केली आहे.

संगमनेर तालुक्यातील अनेक गावात मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. आमदार अमोल खताळ यांनी तात्काळ अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याचे आदेश दिले होते त्यानुसार अधिकाऱ्यांनी नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे पूर्ण करून शासनाला अहवाल सादर केला होता या सर्व नुकसानीची महायुती सरकारने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला राज्यातील बाधित शेतकऱ्यांसाठी तब्बल १६४ कोटी ८३ लाखाची नुकसान भरपाई मंजूर केली आहे.त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्या साठी २५ कोटी २० लाखाची मदत जाहीर करण्यात आली असून यात संगमनेर तालुक्या साठी ४ कोटी ३७ लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे.


**२,३७१.९२ हेक्टर क्षेत्रावरील नुकसान भरपाई....**

संगमनेर तालुक्यातील १९ बाधित गावांतील ५,५९९ शेतकऱ्यांना थेट लाभ होणार असून, २३७१.९२ हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीची महायुती सरकारने दखल घेऊन ही मदत दिली जात आहे. संकटाच्या अत्यंत कठीण काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी नेहमीप्रमाणे ठामपणे उभे राहून त्यांना मोठा दिलासा देण्याचे काम शिवसेना महायुती सरकारने केले असून, त्यामुळे आ. खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनित्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

**१९ गावांतील ५,५९९ शेतकऱ्यांना थेट लाभ**








# डिझेल टंचाईमुळे जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये लिलाव बंद

मुंबई (वृत्तसंस्था)

डिझेलची टंचाई निर्माण झाल्यामुळे आशिया खंडातील सर्वात मोठी कांदा बाजार समिती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासलगाव बाजार समितीतील व्यापाऱ्यांनी सोमवारपासून (दि.२५) कांदा व धान्याचे लिलाव बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, जोपर्यंत डिझेलचा पुरवठा सुरळीत होत नाही, तोपर्यंत अन्य राज्यांमध्ये कांदा व धान्य पाठविणेही बंद ठेवण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे जिल्ह्यातील शेतमालावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, जिल्ह्यातील इतर बाजार समित्यांनीही हेच धोरण स्वीकारण्याचा निर्णय घेतला असून, त्याचा थेट परिणाम इतर भागांत जाणाऱ्या भाजीपाल्यावरही होण्याची शक्यता आहे.केंद्र सरकारने मागील आठवड्यात दोन वेळा पेट्रोलियम पदार्थांच्या किमती वाढवल्यानंतर अचानक डिझेलची टंचाई निर्माण झाली आहे. प्रशासन आणि राज्य सरकारकडून डिझेल व पेट्रोल मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात शेतीसाठी आवश्यक डिझेल उपलब्ध होत नसल्याने शेतीकामांवर थेट परिणाम होऊ लागला आहे.

दुसरीकडे, भाजीपाला, कांदा व धान्य बाजार समितीत लिलावासाठी आणण्यासाठी शेतकऱ्यांकडे डिझेल नसल्याने आवकही प्रभावित होत आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनी पुढील पावले उचलण्यास सुरुवात केली असून, सोमवारपासून मोठी अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. कांदा व इतर शेतीमाल इतरत्र पाठविण्यासाठी ट्रकचालकांना इंधन उपलब्ध होत नसल्यामुळे बाजार समितीतील कांदा व धान्याचे लिलाव सोमवार (दि. २५) पासून बेमुदत बंद राहणार आहेत. लिलाव ठप्प झाल्यास कांद्याचे दर आणखी घसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. व्यापारी असोसिएशनने सोमवारपासून कांदा व धान्य लिलावात सहभागी होणार नसल्याचे पत्र बाजार समितीला दिले आहे.

# रिझर्व्ह बँकेकडून केंद्र सरकारला विक्रमी २.८७ लाख कोटींचा लाभांश

मुंबई (वृत्तसंस्था)

भारतीय रिझर्व्ह बँक ने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारला तब्बल २.८७ लाख कोटी रुपयांचा विक्रमी लाभांश देण्याची घोषणा केली आहे. जागतिक आर्थिक आव्हाने, वाढती अनिश्चितता आणि विविध आर्थिक दबावांच्या पार्श्वभूमीवर हा निधी केंद्र सरकारसाठी मोठा आर्थिक दिलासा मानला जात आहे. रिझर्व्ह बँकेच्या इतिहासातील केंद्र सरकारला दिला जाणारा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा लाभांश ठरणार आहे.

हा महत्त्वपूर्ण निर्णय रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळाच्या ६२३ व्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीचे अध्यक्षस्थान रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी भूषविले. बैठकीत वित्त वर्ष २०२५-२६ साठी केंद्र सरकारला २.८७ लाख कोटी रुपयांचा अधिशेष हस्तांतरित करण्यास मंजुरी देण्यात आली.मागील आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये रिझर्व्ह बँकेने केंद्र सरकारला २.६९ लाख कोटी रुपयांचा लाभांश दिला होता. यंदाचा लाभांश त्या तुलनेत अधिक असून नव्या विक्रमाची नोंद झाली आहे.

रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षात जोखीम तरतूद आणि वैधानिक निधीमध्ये हस्तांतरण करण्यापूर्वी बँकेचे निव्वळ उत्पन्न ३ लाख ९५ हजार ९७२.१० कोटी रुपये इतके राहिले. मागील आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये हेच उत्पन्न ३ लाख १३ हजार ४५५.७७ कोटी रुपये होते. त्यामुळे यंदा उत्पन्नात लक्षणीय वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहेयापूर्वी २०२३-२४ मध्ये रिझर्व्ह बँकेने २.१ लाख कोटी रुपये, तर २०२२-२३ मध्ये ८७ हजार ४१६ कोटी रुपये केंद्र सरकारकडे हस्तांतरित केले होते. त्यामुळे गेल्या काही वर्षांत लाभांशाच्या रकमेत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते.

रिझर्व्ह बँकेच्या या विक्रमी लाभांशामुळे केंद्र सरकारच्या महसुलात मोठी भर पडणार असून पायाभूत सुविधा, सामाजिक कल्याण योजना आणि विकास प्रकल्पांसाठी अतिरिक्त आर्थिक बळ मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# दुसऱ्याचा गुन्हा लवांडेंच्या माथी

पुणे (वृत्तसंस्था)



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना अटक झाल्यानंतर आता पुणे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्जाला विरोध करताना पोलिसांनी लवांडे यांच्या नावावर असा गुन्हा दाखवला, जो त्यांनी कधी केलाच नव्हता. मात्र दुसऱ्याच दिवशी न्यायालयात सादर केलेल्या रिमांड रिपोर्टमध्ये हा प्रकार 'नजरचुकीने' घडल्याची कबुली पुणे पोलिसांनी दिली. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.

विकास लवांडे यांच्यावर ८ मे रोजी वाघोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. अटक टाळण्यासाठी त्यांनी न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला होता. या अर्जाला विरोध करताना पोलिसांनी त्यांच्या विरोधातील पूर्वीचे गुन्हे न्यायालयासमोर मांडले. त्यामध्ये २०१७ मध्ये बिबवेवाडी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्याचा उल्लेख करण्यात आला. प्रत्यक्षात २०१७ मध्ये नथुराम गोडसे विरोधातील आंदोलनादरम्यान लवांडे यांच्यावर गुन्हा क्रमांक ३२/१७ दाखल झाला होता. हा गुन्हा २०२२ मध्ये शासनाने मागे घेतला होता. मात्र पोलिसांनी न्यायालयात ३२/१७ ऐवजी ३३/१७ हा गुन्हा दाखवला.

विशेष म्हणजे गुन्हा क्रमांक ३३/१७ हा गौतम कांबळे नावाच्या व्यक्तीवर दाखल होता. दारू पिऊन गोंधळ घातल्याप्रकरणी त्याच्यावर कारवाई करण्यात आली होती. त्या प्रकरणातून कांबळे यांचीही निर्दोष मुक्तता झाली होती. तरीही हा गुन्हा विकास लवांडे यांच्या नावावर दाखवण्यात आल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे. न्यायालयात याबाबत प्रश्न उपस्थित झाल्यानंतर पोलिसांनी नजरचूक झाल्याचे सांगितले. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत पोलिसांनी चुकीची माहिती दिली का? असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, विकास लवांडे हे गेल्या काही दिवसांपासून वारकरी संप्रदायाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे चर्चेत आहेत. वारकरी संप्रदायात काही लोकांची घुसखोरी झाली आहे, असा दावा करत त्यांनी सोशल मीडियावर काही वारकऱ्यांची यादी प्रसिद्ध केली होती. या वक्तव्यानंतर राज्यभरातून त्यांच्यावर टीका झाली होती. काही दिवसांपूर्वी पुण्याकार्यकर्त्यांनी लवांडे यांचा दुग्धाभिषेक करून समर्थन दर्शवले होते. त्यानंतर पोलिसांनी गुरुवारी त्यांना अटक केली.

अटकेनंतर विकास लवांडे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पुणे पोलिसांवर गंभीर आरोप केले. चोर सोडून संन्याशाला फाशी, अशी टीका करत त्यांनी आपल्या घरावर रात्री पोलिस गेल्याचा दावा केला. माझ्यावर हल्ला करणारे आरोपी मोकाट आहेत, पण मला खोट्या तक्रारीवरून अटक करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे त्यांनी म्हटले. मी फरार नाही, कायद्याचा आदर करणारा माणूस आहे. पोलिसांनी फोन केला असता तर मी स्वतः हजर झालो असतो, असेही लवांडे यांनी स्पष्ट केले. या सर्व घडामोडींमुळे आता पुणे पोलिसांच्या तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.त त्यांच्यावर शाईफेकही करण्यात आली होती. या घटनेनंतर शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी लवांडे यांचा दुग्धाभिषेक करून समर्थन दर्शवले होते. त्यानंतर पोलिसांनी गुरुवारी त्यांना अटक केली.

अटकेनंतर विकास लवांडे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पुणे पोलिसांवर गंभीर आरोप केले. चोर सोडून संन्याशाला फाशी, अशी टीका करत त्यांनी आपल्या घरावर रात्री पोलिस गेल्याचा दावा केला. माझ्यावर हल्ला करणारे आरोपी मोकाट आहेत, पण मला खोट्या तक्रारीवरून अटक करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे त्यांनी म्हटले. मी फरार नाही, कायद्याचा आदर करणारा माणूस आहे. पोलिसांनी फोन केला असता तर मी स्वतः हजर झालो असतो, असेही लवांडे यांनी स्पष्ट केले. या सर्व घडामोडींमुळे आता पुणे पोलिसांच्या तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# एलसीबीची कारवाई, चार गोवंश जनावरांची सुटका

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या चार गोवंश जनावरांची सुटका करत अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई केली असून आरोपींकडून तब्बल ६ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून चार आरोपी फरार आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार व स्थानिक गुन्हे शाखेचे पो-लीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली गोवंश जनावरांची अवैध वाहतूक व कत्तलीसंदर्भातील गुन्ह्यांवर कारवाई करण्यासाठी विशेष पथक नियुक्त करण्यात आले होते. पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार योगेश कर्डिले, अमृत आढाव व चालक उत्तरेश्वर

मोराळे यांचा या पथकात समावेश होता. शुक्रवारी (दि.२२) पहाटे संगमनेर तालुका पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग सुरू असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, कलीम चाँद कुरेशी (रा. मोगलपुरा, संगमनेर) हा त्याच्या साथीदारांसह कोतूळ (ता. अकोले) येथून गोवंश जनावरे पिकअप वाहनातून भरून निमगाव पागा-धांदरफळ खुर्द मार्गे संगमनेरकडे कत्तलीसाठी आणत आहे.

या माहितीच्या आधारे पथकाने धांदरफळ खुर्द परिसरात सापळा रचला. काही वेळातच संशयित पांढऱ्या रंगाचे पिकअप वाहन येताना दिसताच ते अडवून तपासणी करण्यात आली. वाहनातील चालकाने आपले नाव अमित बाळासाहेब पवार (वय ३०, रा. कोतूळ) व सोबतचा इसम हौशीराम वामन खरात (वय ५०, रा. कोतूळ) असल्याचे सांगितले.

जनावरे अन्वर बाबू तांबोळी (रा. कोतूळ), चौकशी दरम्यान वाहनातील गोवंशीय फैजू नसरुद्दीन काझी (रा. मोगलपुरा, संगमनेर), कलीम चाँद कुरेशी (रा. मो-गलपुरा, संगमनेर) आणि बाबा अशरफ कुरेशी (रा. भारतनगर, संगमनेर) यांची असल्याचे समोर आले. संबंधित चारही आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या कारवाईत पोलिसांनी १ लाख १५ हजार रुपये किमतीची चार जिवंत गोवंश जनावरे, ५ लाख रुपये किमतीचे पिकअप वाहन तसेच ३० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन असा एकूण ६ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास तालुका पोलीस करत आहेत.

# महावितरणच्या जलद कारवाईमुळे मोठी दुर्घटना टळली



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील प्रभाग आठ मधील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर मार्गावर शनिवारी पहाटे सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास महावितरण कंपनीची वीजवाहक तार अचानक तुटून रस्त्यावर पडल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तारेतून वीज प्रवाह सुरू असल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे संभाव्य अनर्थ टळला.

घटनेची माहिती मिळताच नगरसेवक गणेश गुंजाळ यांनी तातडीने महावितरणचे अभियंता सुनील अहिरे यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. माहिती मिळताच अभियंता अहिरे यांनी तात्काळ हालचाली सुरू करत अवघ्या पाच मिनिटांत वायरमन निलेश सातपुते व दिनेश रसाळ यांना घटनास्थळी पाठवले. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत तातडीने संबंधित भागाचा वीज पुरवठा काही काळासाठी बंद केला आणि दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर पूर्ण केले. त्यांच्या सतर्कतेमुळे नागरिकांच्या जीविताला असलेला धोका टळून मोठी दुर्घटना टाळण्यात यश आले.

या संकटसमयी दाखवलेल्या तात्काळ प्रतिसाद आणि जबाबदार कार्यपद्धतीबद्दल अभियंता सुनील अहिरे, वायरमन निलेश सातपुते आणि दिनेश रसाळ यांचे प्रभागातील नागरिकांच्या वतीने नगरसेवक गणेश गुंजाळ यांनी जाहीर आभार व्यक्त केले.

# रोहित पवारांवर शरद पवारांची मोठी जबाबदारी

मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सध्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. काही दिवसांपूर्वी अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांनी शरद पवार यांची भेट घेतली होती, ज्यामुळे शरद पवार गटात अंतर्गत अस्वस्थता निर्माण झाल्याची चर्चा होती. या भेटीमुळे शरद पवारांचे नातू आणि आमदार रोहित पवार नाराज असल्याच्या आणि पक्षाच्या बैठकीला अनुपस्थित राहिल्याच्या चर्चांना उधाण आले होते. मात्र, या सर्व चर्चांच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांनी रोहित पवारांवर एक मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय अध्यक्षपदी रोहित पवार यांची निवड करण्यात आली असून, स्वतः रोहित पवारांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. रोहित पवार मागील ६ वर्षांपासून रयत शिक्षण संस्थेवर 'सदस्य' म्हणून कार्यरत होते. आता त्यांच्याकडे उत्तर विभागाच्या अध्यक्षपदाची धुरा देण्यात आली आहे.या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत रोहित पवारांनी पोस्टमध्ये, 'बहुजन समाजाच्या मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या आणि आज आदरणीय पवार साहेबांच्या हाती धुरा असलेल्या 'रयत शिक्षण संस्थे'च्या उत्तर विभागीय अध्यक्षपदी निवड केल्याबद्दल आदरणीय पवार साहेब आणि संस्थेच्या सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे मनापासून आभार! मागील गेली सहा वर्षे संस्थेवर सदस्य म्हणून आणि सर्वांना सोबत घेऊन केलेल्या कामाची ही पोचपावतीच आहे, असं मी मानतो.


Happy Birthday



मा. डॉ. अमोल कासार
संचालक, सिद्धी हॉस्पीटल, संगमनेर



ॲड. उदयसिंह ढोमसे
अध्यक्ष, संगमनेर बार असोशिएशन

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता


# 'नीट' प्रकरणात उतरली 'कॉक्रोच जनता पार्टी' शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी मोहीम

मुंबई (वृत्तसंस्था)




'कॉक्रोच जनता पार्टी' (सीजेपी) आता नीट प्रकरणात उतरली असून, त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत नवी मोहीम सुरू केली. 'कॉक्रोचेस नेव्हर डाय' या घोषवाक्यासह नव्या 'एक्स' खात्यावरून ही मोहीम सुरू करण्यात आली. 'सीजेपी'चे संस्थापक अभिजित दीपके यांनी ऑनलाइन याचिकेद्वारे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्याचे आवाहन केले. एका व्हिडीओ संदेशात त्यांनी शिक्षणव्यवस्थेला जबाबदार धरण्याची वेळ आल्याचे म्हटले. दीपके म्हणाले, व्यवस्थेच्या अपयशामुळे २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य प्रभावित झाले. नीट परीक्षेच्या तणावामुळे विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. यासाठी जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिलाच पाहिजे.'कॉक्रोच जनता पार्टी' ताकद दाखवणार?कॉक्रोच जनता पार्टी'ने येत्या २४ मे रोजी बंगळुरूच्या टाऊन हॉलसमोर मानवी साखळी तयार करण्याचे आवाहन केले आहे. मात्र या आंदोलनाला कोणतीही परवानगी नसल्याचे स्पष्ट केले आहे. तरुणांना भवितव्य नाही, नीट परीक्षेचा ताण आणि महागाई यांसारख्या मुद्द्यांवरून या गटाने २४ मे रोजी सकाळी ११ वाजता टाऊन हॉलसमोर शक्तीप्रदर्शनासाठी जमण्याचे आवाहन केले आहे. कॉक्रोचची ताकद फक्त ऑनलाइन नाही, तर रस्त्यावरही दिसेल, असे पोस्टरमध्ये म्हटले आहे. खाते बंद, पण...सीजेपीचे मूळ 'एक्स' खाते भारतात बंद केल्यानंतर 'कॉक्रोच इज बॅक' या नावाने नवे खाते सुरू करण्यात आले. 'खाते हॅक करण्याचे प्रयत्न सुरू होते. सरकारचा हा आत्मघातकी निर्णय आहे,' असे दिपके यांनी म्हटले. त्यांच्या म्हणण्यानुसार, मूळ खात्याचे दोन लाखांहून अधिक अनुयायी होते. नव्या खात्याने २४ तासांत सुमारे १.६५ लाख फॉलोअर्स मिळवले.

# साईनगरीत साकारणार महाराष्ट्राचे पहिले मोठे डिफेन्स हब

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात (पूर्वीचे अहमदनगर) असलेल्या शिर्डी साई मंदिरापासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर, राज्य कृषी विकास महामंडळाच्या पडीक जमिनीवर 'शिर्डी डिफेन्स कॉम्प्लेक्स' वेगाने आकार घेत आहे. येथे रस्त्यांचे काम पूर्ण झाले आहे. मोठे-मोठे डोम उभे आहेत आणि इंडियन आर्मी, नेव्ही, एअरफोर्सशी संबंधित सरकारी-खाजगी कंपन्यांचे १०० हून अधिक प्रदर्शन स्टॉल लावले जात आहेत.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत शनिवारी या डिफेन्स क्लस्टरचे उद्घाटन होणार आहे. डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी 'ग्लोब फोर्ज'ने या कॉम्प्लेक्ससाठी ३ हजार कोटी रुपये गुंतवणुकीची घोषणा केली आहे.

कॉम्प्लेक्स २०० एकरमध्ये पसरलेला आहे. येथे अर्धा-अर्धा किलोमीटरचे ६ मोठे डोम तयार आहेत. कंपनीनुसार, वर्षाला ५ लाख तोफेचे गोळे बनवण्यासाठी २ असेंब्ली लाईन्स लावल्या जात आहेत. त्याचबरोबर, डिफेन्स ड्रोन आणि आरडीएक्सशी संबंधित प्रकल्पही उभे केले जात आहेत. ग्लोब फोर्जचे एम.डी. गणेश निबे यांचे म्हणणे आहे की 'स्वदेशी' आणि 'आत्मनिर्भरता' धोरणामुळे एमएसएमईला मोठ्या संधी मिळत आहेत.

ग्लोब फोर्ज संपूर्ण जिल्ह्यात १० हजार कोटी रु. ची गुंतवणूक करण्याचा दावा करत आहे. औद्योगिक विकास अधिकारी गणेश राठोड यांच्या मते, समृद्धी महामार्ग, शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आंतरराष्ट्रीय कार्गो टर्मिनल, जमीन-पाण्याची उपलब्धता यामुळे सरकार शिर्डी डिफेन्स क्लस्टरला 'स्ट्रॅटेजिक



लोकेशन' म्हणून विकसित करत आहे. यामुळे २,००० प्रत्यक्ष आणि ५,००० अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील असा दावा आहे. या क्लस्टरमध्ये टॉरेल इंडिया आणि ब्राझीलच्या अकाएरसारख्या कंपन्यांनीही प्लांट सुरू करण्याच्या शक्यता तपासण्यासाठी सर्वेक्षण सुरू केले आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून समृद्धी महामार्गालगत चाकण, मिहान, नाशिक एचएएल, शिर्डी, सुपे, श्रीगोंदा आणि छत्रपती संभाजीनगर यांना जोडून संरक्षण इकोसिस्टम (संरक्षण परिसंस्था) उभारण्याच्या योजनेला गती दिली जात आहे. या परिसरात याला 'भक्ती आणि शक्ती'चा संगम म्हणून पाहिले जात आहे.याच वर्षी जानेवारीत 'निबे ऑर्डिनन्स'सोबत स्वदेशी क्षेपणास्त्र 'सूर्यास्त्र'च्या निर्मितीसाठी 'आपत्कालीन खरेदी' करार झाला. निबेने इस्रायलच्या एल्बिट कंपनीसोबत तांत्रिक भागीदारी करून 'सूर्यास्त्र' तयार केले आहे, ज्याची नुकतीच ओडिशात यशस्वी चाचणी झाली. आता या क्षेपणास्त्राचे हार्डवेअर शिर्डीतील याच संरक्षण संकुलात बनवण्याची तयारी आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# संगमनेर–पुणे बस सेवा साकुरमार्गे सुरु करण्याची मागणी

## आगार प्रमुखांकडून लवकरच बस सुरू करण्याचे आश्वासन

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर परिवहन मंडळाचे आगारप्रमुख श्री. गुंड यांची भेट घेऊन साई सिद्धी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. अमृता अनिल कोळपकर यांनी संगमनेर-पुणे बस सेवा साकुरमार्गे पुन्हा सुरू करण्याबाबत निवेदन सादर केले. या बससेवेचा लाभ साकुर, जांबुत, नांदूर, घारगाव परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

निवेदनामध्ये संगमनेर-पुणे ही बस साकुर, जांबुत, नांदूर, घारगाव मार्गे पुण्याकडे जावी, तसेच पुणे-संगमनेर परतीची बसही घारगाव, जांबुत मार्गे साकुरपर्यंत चालविण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या मार्गावरील विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी तसेच सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय दूर होण्यासाठी ही बससेवा अत्यंत आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.



यावेळी आगारप्रमुख गुंड यांनी मागणीची दखल घेत संबंधित बससेवा लवकरात लवकर सुरू करण्याचा सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन दिले. या निर्णयामुळे साकुर व परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, बससेवा लवकर सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जिल्ह्यात इंधनाचा सुरळीत पुरवठा राखत समानतेने इंधन वाटप करा- जिल्हाधिकारी

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)- जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा सुरळीत पुरवठा राखण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. पेट्रोल, डिझेलचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच प्रत्येक तालुक्यात इंधनाचे समानतेने वाटप करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात पेट्रोल, डिझेल पुरवठ्याबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, यांच्यासह विविध कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच पेट्रोल डिलर्स असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, पुणे आणि मनमाड येथील इंधन डेपो निर्धारित वेळेपेक्षा अधिक वेळ सुरू ठेवून जिल्ह्यातील पेट्रोल पंपांना इंधनाचा अविरत पुरवठा होईल याची दक्षता घ्यावी. नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

इंधन वाटपावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पेट्रोल पंप परिसरात पोलीस पेट्रोलिंग वाढविण्यात यावी. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर नागरिकांना सुरळीत सेवा मिळणे आवश्यक असून पेट्रोलपंप चालकांनी ग्राहकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. पुरवठा साखळी सक्षम ठेवणे तसेच नागरिकांना वेळेत इंधन उपलब्ध करून देण्यासाठी समन्वयाने कार्य करण्यावर भर देण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या. बैठकीत जिल्ह्यातील पेट्रोल आणि डिझेल साठा, पुरवठा व्यवस्था, वाहतूक समन्वय तसेच विविध तालुक्यांतील इंधन उपलब्धतेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

# राष्ट्रीय रंगमंचावर "आर्ट बाय हार्ट"चा झंझावात

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- पुणे येथे अखिल लोककला कल्चरल ऑर्गनायझेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भारत महोत्सव २०२६ हा राष्ट्रीय स्तरावरील कला महोत्सव दि. १६ ते २१ मे दरम्यान उत्साहात पार पडला. देशभरातील विविध राज्यांमधून आलेल्या स्पर्धकांनी नृत्य, संगीत, अभिनय आणि वादन अशा विविध कला प्रकारांत आपली कला सादर करत स्पर्धेला रंगत आणली. या प्रतिष्ठित राष्ट्रीय व्यासपीठावर संगमनेरच्या आर्ट बाय हार्ट अकॅडमीने दमदार कामगिरी करत नऊ पारितोषिकांवर आपला ठसा उमटवला. अकॅडमीचे संचालक प्रशांत युवराज त्रिभुवन यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल २८ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेत उल्लेखनीय यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणामुळे संगमनेरच्या कला क्षेत्राची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली.




वैयक्तिक स्पर्धांमध्ये क्षितिज ज्ञानदेव मुसळे यांनी भारतीय वादन प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला, तर श्राव्या योगेश सहाने हिने भारतीय सुगमगायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. त्रिशा सचिन कदम हिने लोकनृत्य प्रकारात प्रथम क्रमांक मिळवत विशेष चमक दाखवली. तसेच अन्वी सचिन फटांगरे आणि वैष्णवी संतोष पारधी यांनी एकपात्री अभिनय स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत आपल्या अभिनय कौशल्याची छाप पाडली. सांघिक स्पर्धांमध्येही अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. एकांकिका, लोकनृत्य, माईम आणि समूह गायन या सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावत संगमनेरच्या कला परंपरेचा ठसा राष्ट्रीय स्तरावर उमटवला.

तसेच जान्हवी देशमुख, अवनी गोसावी, आरोही मंडलिक, साईषा बाचकर, अमेय कुलकर्णी, आराध्य रहाणे, अरव आडंगळे, ज्ञानदा गुंजाळ, तन्वी देशमुख, श्रीराज हिरे, आकांक्षा गोर्डे, ऋषिकेश कोटकर, तनिष्का गुंजाळ, ईश्वरी पांडे आणि लक्ष्मी कासार यांनीही विविध कला प्रकारांत उल्लेखनीय सहभाग नोंदवत अकॅडमीच्या यशात मोलाची भूमिका बजावली. विशेष म्हणजे, या राष्ट्रीय स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर विजयी विद्यार्थ्यांची निवड आता व्हिएतनाम येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कला महोत्सवासाठी करण्यात आली आहे. त्यामुळे संगमनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

स्पर्धेदरम्यान विविध कला क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना दिग्दर्शन व मार्गदर्शन प्रशांत युवराज त्रिभुवन यांचे लाभले, तर वेशभूषेसाठी लिनिअर ड्रेपरी, घुलेवाडी (श्री. वसंत बंदावणे) यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचे परिश्रम, पालकांचे प्रोत्साहन आणि अकॅडमीचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. संगमनेर परिसरातून या यशाबद्दल विद्यार्थ्यांवर आणि मार्गदर्शकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अवैध वाळू वाहतूक करणारा पिकअप पकडला

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) तालुक्यातील खांडगाव शिवारात अवैधरित्या वाळूची वाहतूक करणारा पिकअप अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी (दि.२०) रात्री पकडला. या कारवाईत पथकाने एक ब्रास वाळू आणि पिकअप असा एकूण ३ लाख १० हजार किमतीचा मुद्देमाल जप्त करत दोघांवर संगमनेर शहर पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार आणि पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार विजय पवार, अमृत आढाव, योगेश कर्डिले, चालक उत्तरेश्वर मोराळे यांचे पथक तयार करुन अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांविरुध्द कारवाई करणेकामी रवाना केले. त्यानुसार हे पथक बुधवारी रात्री संगमनेर शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करुन अवैध धंद्यांची माहिती काढत असताना गुप्त बातमीदारामार्फत समजले की, शरद कारभारी गुंजाळ (रा.खांडगाव, ता. संगमनिर) हा व्याच्या हस्तकामार्फत नाशिक रस्त्याकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडने खांडगाव शिवार येथून अवैधरित्या पिकअपमध्ये वाळूची चोरुन वाहतूक करत आहे.

पथकाने तत्काळ खांडगाव पूल येथील नाशिक रस्त्याकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडने सापळा लावला

(पान नं. ४ वर)

# अवैध गर्भलिंग निदान प्रकरणी आणखी दोघांना अटक

## आतापर्यंत १८ आरोपी जेरबंद

श्रीरामपूर (युवावार्ता प्रतिनिधी)- राहाता तालुक्यातील लोणी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अवैध गर्भलिंग निदान चाचणी व बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाचा तपास दिवसेंदिवस अधिक व्यापक होत असून, पोलिसांनी नाशिक जिल्ह्यातील निफाड येथून आणखी दोन आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणात आतापर्यंत एकूण १८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये सहा डॉक्टरांचा समावेश आहे, अशी माहिती अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी दिली.



या गुन्ह्यात सुरुवातीला नेवासा येथील डॉ. भणगे, दोन एजंट आणि सहा कुटुंबीय अशा नऊ जणांना अटक करण्यात आली होती. आरोपींकडून एक पोर्टेबल सोनोग्राफी मशीन, तसेच तीन चारचाकी वाहने जप्त करण्यात आली होती. पुढील तपासात ढगे नामक आरोपीकडून आणखी एक पोर्टेबल सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आले. त्यानंतर अनेक एजंटांना अटक करण्यात आली.

तपासादरम्यान श्रीरामपूर येथील डॉ. रवींद्र कुटे व डॉ. राज शेख यांनाही अवैध गर्भलिंग निदान चाचणी व बेकायदेशीर गर्भपात प्रकरणात अटक करण्यात आली. पुढे पोलिसांनी पुणे येथील दोन डॉक्टर व वैद्यकीय साहित्य विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला ताब्यात घेतले. तसेच वडगाव मावळ येथील मारुती ढोरे यालाही आरोपी करून त्याच्याकडून अवैध लिंगनिदानासाठी वापरले जाणारे मशीन जप्त करण्यात आले.

पोलिसांनी शास्त्रोक्त व बारकाईने तपास करत असताना, पुण्यात अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील दोन जणांनीही अवैधरित्या सोनोग्राफी मशीन खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक रवाना करण्यात आले. पथकाने पहाटे कारवाई करून दोघांना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये डॉ. कुणाल प्रभाकर वल्टे (वय ३३), रा. सरस्वतीनगर, निफाड, यांचा समावेश असून, त्यांचा करंजगाव येथे दवाखाना आहे. तपासात त्यांनी आरोपी ठाकरे याच्याकडून सोनोग्राफी मशीन घेतल्याचे समोर आले आहे. तसेच सागर शांताराम उल्हाळ (वय २५), रा. नांदूर मधमेश्वर, ता. निफाड, यालाही अटक करण्यात आली आहे. त्याच्या ब्लड टेस्टिंग लॅबमध्ये संबंधित मशीन ठेवण्यात आल्याची माहिती तपासात पुढे आली आहे.

दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता, चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात आतापर्यंत वेगवेगळ्या जिल्ह्यांतून चार सोनोग्राफी मशीन आणि तीन चारचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत.

या गुन्ह्याचा पुढील तपास जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक आठरे करत आहेत.

# शेती, शेतकरी आणि लग्न : विदारक सामाजिक समस्या

नुकताच जगदंब फाउंडेशन संचालित 'मराठा सोयरीक संस्थेच्या' १०८ व्या भव्य मोफत वधू-वर परिचय मेळाव्यात उपस्थित राहण्याचा योग आला. खांडेश्वर सांस्कृतिक भवन, खांडगाव येथे तो संपन्न झाला. संस्थेचे अध्यक्ष आणि माझे स्नेही श्री. अशोकजी कुटे, तसेच सन्मित्र श्री. संजयजी आंबरे व श्री. श्रीकांतजी बिडवे यांच्या आग्रहाच्या निमंत्रणामुळे या मेळाव्याला जाता आले. तिथे आल्यावर शेकडो तरुण आणि त्यांच्या हताश पालकांच्या मनातील जी खदखद, जे दुःख जवळून अनुभवता आले, त्याने मन सुन्न आणि विदीर्ण झाले. आज ग्रामीण महाराष्ट्रात एक अत्यंत गंभीर आणि विदारक सामाजिक समस्या मूळ धरत आहे, ज्याकडे शासन, प्रशासन आणि समाज सोयीस्करपणे डोळेझाक करत आहे. ती समस्या म्हणजे - 'शेतकरी मुलांची लग्न न होणे' आणि त्यातून ग्रामीण भागात निर्माण झालेली 'लग्नाची काळी बाजारपेठ व क्रूर फसवणूक'.

मुलींना फक्त 'नोकरीवालाच' नवरा हवाय का? आजकाल प्रत्येक मुलीला किंवा तिच्या पालकांना शहरात राहणारा, नोकरी करणारा (नोकरीवाला) नवरा हवा आहे. मुलगा गावात राहून, मातीशी इमान राखून किती कमावतो, यापेक्षा त्याला महिन्याला ठराविक पगार देणारी नोकरी आहे का, यालाच प्राधान्य दिले जात आहे. मेळाव्यात एका सुशिक्षित तरुणाची व्यथा ऐकली. तो मुलगा 'बीएससी ग्री' पदवीधर आहे. नदीकाठच्या सुपीक गावात त्याची १०-१२ एकर उत्तम बागायती जमीन आहे. देखणा, सुशिक्षित आणि सदन असूनही, केवळ तो शेती करतो आणि गावात राहतो म्हणून त्याला मुलगी मिळायला तयार नाही. ज्या मातीत सोन्यासारखं पीक पिकवण्याचे सामर्थ्य या तरुणाच्या मनगटात आहे, ती काळी आई आणि तिचा पुत्र आज लग्नाच्या बाजारात 'अपात्र' ठरत आहेत. हे आपल्या संस्कृतीचे मोठे दुर्दैव नाही तर काय?

'एजंट' राज आणि काळजाचा थरकाप उडवणारी फसवणूक. मुली मिळत नसल्यामुळे ग्रामीण भागातील तरुण आणि त्यांचे हताश झालेले वृद्ध आई-वडील आता 'लग्नाच्या बनावट एजंट्स'च्या जाळ्यात सहज अडकत चालले आहेत. लाखो रुपये घेऊन परराज्यातून किंवा दुर्गम भागातून मुली आणून लग्न लावून देणाऱ्या टोळ्या सध्या ग्रामीण भागात कमालीच्या सक्रिय आहेत. यातून होणारी फसवणूक अत्यंत क्रूर आणि काळजाचा थरकाप उडवणारी आहे. असाच एक अनुभव तिथल्या एका असहाय्य शेतकऱ्याने सांगितला. दोन सख्खे भाऊ, ज्यांची डाळिंबाची उत्तम बाग आहे, अपार कष्टाच्या जोरावर दरवर्षी १० लाखांच्या वर उत्पन्न काढतात. पण कपाळाला शेतीचा शिक्का असल्यामुळे लग्न जमेना. शेवटी समाजात मान मिळवण्यासाठी आणि वंशाचा दिवा तेवता ठेवण्यासाठी त्यांनी एजंटमार्फत लाखो रुपये खर्च करून सुरगाणा-पेठ परिसरातून एका मुलीशी मोठ्या भावाचे लग्न लावून दिले. पण त्या मुलीला चोऱ्या करण्याची सवय होती. घराशेजारी, भाऊबंदांच्या घरात चोऱ्या करून तिने या प्रतिष्ठित कुटुंबाची समाजात बेअब्रू केली. दोन वर्षे घरातल्यांनी मान वाचवण्यासाठी तिला कशीबशी सांभाळली. पण शेवटी तिने शेजाऱ्यांकडेच मोठी चोरी केली आणि घरातून पळून गेली. धक्कादायक बाब म्हणजे, तिथून गेल्यावर दोनच महिन्यांत तिने दुसरीकडे लग्नही उरकून घेतले. कहाणी इथेच संपत नाही. धाकट्या भावाची अवस्था तर त्याहून भयंकर आणि वेदनादायी ठरली. त्याच्यासाठी याच एजंटमार्फत विदर्भाकडची मुलगी आणली गेली. पण ती तर अवघ्या चार महिन्यांतच घरातील कष्टाचे पैसे आणि दागिने घेऊन रात्रीतून पळून गेली! ही दोन उदाहरणे केवळ प्रातिनिधिक आहेत. आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, प्रत्येक गावात अशा फसवणुकीचे शेकडो बळी उघड्या डोळ्यांनी स्वतःची राखरांगोळी पाहताना दिसत आहेत.



ही एका घराची नव्हे, 'नव्या सामाजिक विनाशाची' नांदी आहे! शेतकरी मुलांची लग्न न होणे, हा आता केवळ एका कुटुंबाचा किंवा जातीचा वैयक्तिक प्रश्न राहिलेला नाही, तर ती एक भीषण सामाजिक समस्या बनली आहे. लग्नाअभावी तरुणांमध्ये वाढणारे नैराश्य, एजंट्सकडून होणारी आर्थिक आणि मानसिक लूट, कौटुंबिक कलह आणि गावात तरुण मुलांची संख्या वाढून मुलींची संख्या घटल्याने निर्माण होत असलेला सामाजिक असमतोल, या सगळ्या गोष्टी ग्रामीण महाराष्ट्राला एका अदृश्य विनाशाकडे ढकलत आहेत. जर या देशाच्या अन्नदात्यालाच हक्काचा जोडीदार मिळणार नसेल, तर पुढची पिढी शेतीत का थांबेल? उद्या शेतात राबायला कोणी उरले नाही, तर देश काय खाणार? याचा विचार शहरात राहणाऱ्यांनी करायला हवा.

शासनाने आणि समाजाने काय करणे गरजेचे आहे?

१पालकांनी हे समजून घेतले पाहिजे की, शेती आणि जमीन ही शाश्वत आहे. नोकरी आज आहे, उद्या नाही. (कोरोना काळात हे आपण पाहिले आहे.) निसर्गाच्या कुशीत, स्वतःच्या जमिनीवर स्वाभिमानाने आणि सन्मानाने जगणारा शेतकरी हा शहरातल्या कोंदट खोलीत राहणाऱ्या छोट्या-मोठ्या नोकरीवाल्यापेक्षा कितीतरी पटीने सुखी, समृद्ध आणि स्वतंत्र आयुष्य जगू शकतो, हा विश्वास मुलींच्या पालकांनी आता बाळगायलाच हवा. २.सरकारने या समस्येची वेळीच गंभीर दखल घेणे गरजेचे आहे. जे कुटुंब किंवा ज्या मुली शेतकरी मुलांशी लग्न करतील, त्यांना शासनाने विशेष प्रोत्साहनपर 'लग्नाळू शेतकरी कुटुंब अनुदान' किंवा आर्थिक मदत जाहीर करावी. तसेच अशा जोडप्यांच्या पाल्यांना भविष्यात शिक्षणात आणि नोकरीत विशेष सवलती दिल्या पाहिजेत, जेणेकरून शेतकरी मुलांशी लग्न करण्याकडे कल वाढेल. ३. लग्न जमवण्याच्या हतबलतेचा गैरफायदा घेऊन ग्रामीण भागातील गरीब आणि गरजू शेतकऱ्यांना लुटणाऱ्या बनावट एजंट्सवर आणि मुली पुरवणाऱ्या टोळ्यांवर थेट गुन्हे दाखल करून 'मोक्का' अंतर्गत अत्यंत कडक कारवाई झाली पाहिजे.

शेतकरी हा या देशाचा खरा पोशिंदा आहे. तो ऊन-पावसात, चिखलात राबतो म्हणून शहरांचे पोट भरते. पण दुर्दैवाने त्याच शेतकऱ्याच्या पोराला आज संसाराची सुखाची चार पावले टाकण्यासाठी आणि डोक्यावर सुखाची सावली मिळवण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. जर हीच परिस्थिती राहिली, तर भविष्यात कोणताही सुशिक्षित तरुण शेती करायला धजावणार नाही. वेळीच या समस्येवर समाजाने, विचारवंतांनी आणि सरकारने एकत्र येऊन युद्धपातळीवर उपाययोजना केल्या नाहीत, तर आपल्या ग्रामीण संस्कृतीचा आणि शेतीचा पाया ढासळल्याशिवाय राहणार नाही.

**– अशोक शेटे, संगमनेर**
**मो. नं. ९९२११६९२८६**

# संपादकीय...

## विकासाच्या केंद्रस्थानी शहरे

जागतिक अर्थव्यवस्थेच्या जवळपास ८० टक्के वाटा शहरांकडून निर्माण होत असताना, आजची शहरे केवळ लोकवस्तीची केंद्रे राहिलेली नाहीत, तर ती जागतिक आर्थिक, तांत्रिक आणि भू-राजकीय परिवर्तनाची प्रमुख केंद्रे बनली आहेत. वाढती लोकसंख्या, पायाभूत सुविधांवरील ताण, हवामान बदल, पाणीटंचाई, वाहतूक व्यवस्थेवरील दबाव आणि डिजिटल यंत्रणांचा विस्तार या सर्व आव्हानांनी शहरांना नव्या प्रकारच्या आंतरराष्ट्रीय सहकार्याची गरज निर्माण करून दिली आहे. याच पार्श्वभूमीवर सिटी डिप्लोमसी अर्थात शहरकेंद्रित कूटनीती ही संकल्पना अधिक प्रभावीपणे पुढे येत आहे. पूर्वी आंतरराष्ट्रीय संबंध हे फक्त राष्ट्रांच्या पातळीवर मर्यादित मानले जात होते; मात्र आता शहरे स्वतःच्या विकासासाठी थेट परदेशी शहरांशी, संस्थांशी आणि जागतिक नेटवर्क्सशी संबंध प्रस्थापित करत आहेत. भारतातही या बदलाची सुरुवात दिसून येत आहे. दिल्ली-बीजिंग, अहमदाबाद-ग्वांगझू यांसारखे भगिनी-शहर करार, तसेच युरोपियन युनियन, फ्रान्स आणि जर्मनी यांच्या सहकार्याने राबवले जाणारे सिटीज २.० उपक्रम याचे उत्तम उदाहरण आहेत. स्मार्ट सिटी मिशन आणि अमृत योजनेमुळे भारतीय शहरांना जागतिक तांत्रिक ज्ञान, पर्यावरणीय नियोजन आणि शाश्वत विकासाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. जागतिकीकरणामुळे शासन व्यवस्थेची पारंपरिक चौकटही बदलत आहे. पूर्वी राष्ट्र-राज्य हेच आंतरराष्ट्रीय व्यवहारांचे केंद्र मानले जात होते; पण आता बहुस्तरीय शासनव्यवस्थेत शहरांनाही स्वतंत्र भूमिका प्राप्त होत आहे. हवामान बदल, सार्वजनिक आरोग्य, शहरी विस्तार आणि पायाभूत सुविधांची उभारणी या क्षेत्रांमध्ये स्थानिक प्रशासन थेट नागरिकांशी जोडलेले असल्याने त्यांची जबाबदारी अधिक वाढली आहे. त्यामुळे अनेक शहरांनी स्वतःच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा मार्ग स्वीकारला आहे. हवामान संकटामुळे ही गरज अधिक तीव्र झाली आहे. कारण हरितगृह वायू उत्सर्जनात शहरांचा मोठा वाटा असला, तरी पूर, उष्णतेच्या लाटा आणि समुद्रपातळी वाढ यांसारख्या संकटांचा सर्वाधिक फटका शहरांनाच बसतो. त्यामुळे जगभरातील शहरे हवामानविषयक उपाययोजनांसाठी स्वतंत्र नेटवर्क्स आणि भागीदाऱ्या उभारत आहेत. सी-४० सिटीज क्लायमेट लीडरशिप ग्रुप सारख्या संघटनांमुळे दिल्लीसारख्या शहरांना न्यूयॉर्ककडून पूरनियंत्रण धोरणे शिकण्याची संधी मिळते, तर दिल्लीचे उष्णता व्यवस्थापन मॉडेल इतर देशांमध्ये अभ्यासले जाते. शहरांच्या या नव्या कूटनीतीचा आर्थिक परिणामही महत्त्वाचा आहे. आज सिटी डिप्लोमसी केवळ सांस्कृतिक देवाणघेवाणीत मर्यादित राहिलेली नाही, तर ती परकीय गुंतवणूक आकर्षित करणे, औद्योगिक क्लस्टर उभारणे, रोजगार निर्मिती आणि जागतिक मूल्यसाखळीत शहरांचे स्थान निर्माण करण्यासाठी प्रभावी साधन बनली आहे. मुंबईचे योकोहामा आणि लॉस एंजेलिससोबतचे संबंध, बेंगळुरूचे सॅन फ्रान्सिस्कोशी असलेले तांत्रिक सहकार्य किंवा दिल्ली-टोकियो भागीदारी या सर्व उदाहरणांतून भारतीय शहरांची जागतिक प्रतिमा अधिक मजबूत होत आहे. जपानने भारतातील शहरी परिवहन, आरोग्य आणि कृषी क्षेत्रासाठी दिलेली मोठी आर्थिक मदत ही अशाच प्रकारच्या सिटी डिप्लोमसीचा भाग आहे. अहमदाबाद-हमामात्सू भागीदारीमुळे हरित तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळत आहे. वाराणसीतील स्वच्छ नदी प्रयोगशाळा प्रकल्प किंवा भारत-नेदरलँड्स हरित हायड्रोजन सहकार्य यांसारखे उपक्रम शहरांना केवळ विकासाची नवी दिशा देत नाहीत, तर त्यांना जागतिक संशोधन आणि नवकल्पनांच्या केंद्रस्थानी आणतात. या प्रक्रियेत कौशल्यपूर्ण कामगारांचे आंतरराष्ट्रीय परिभ्रमणही महत्त्वाचे ठरत आहे. विशेषतः युरोपातील काही देशांमध्ये कुशल मनुष्यबळाची कमतरता वाढत असताना भारतीय शहरांना कौशल्य देवाणघेवाणीच्या माध्यमातून मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, अभियांत्रिकी आणि बांधकाम क्षेत्रातील भारतीय कौशल्याला जागतिक स्तरावर मोठी मागणी आहे. त्यामुळे शहर-ते-शहर सहकार्य भविष्यात आर्थिक कूटनीतीचे प्रभावी साधन ठरू शकते. मात्र या सर्व प्रक्रियेत काही धोकेही आहेत. बाह्य वित्तपुरवठ्यावर जास्त अवलंबित्व, असमतोल विकास, भांडवलकेंद्री धोरणे आणि सामाजिक विषमता वाढण्याचा धोका नाकारता येत नाही. त्यामुळे सिटी डिप्लोमसीचा उद्देश केवळ गुंतवणूक आकर्षित करणे नसून अधिक समावेशक, शाश्वत आणि नागरिककेंद्रित विकास घडवणे हा असायला हवा.


युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची



# सामाजिक कार्यकर्ते सुनील उकिर्डे मित्रपरिवाराकडून जिल्हा पोलीस प्रमुख मुम्मका सुदर्शन यांचा सत्कार




अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)- जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हा पोलीस प्रमुख मुम्मका सुदर्शन यांनी नुकताच पदभार स्वीकारल्यानंतर विविध स्तरांतून त्यांचे स्वागत करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते सुनील उकिर्डे यांनी मित्रपरिवारासमवेत भेट घेत, त्यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

अहिल्यानगर येथील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात झालेल्या या भेटीदरम्यान मुम्मका सुदर्शन यांनी उपस्थितांशी मनमोकळा संवाद साधला. आंध्रप्रदेश राज्याचे सुपुत्र असतानाही त्यांनी शुद्ध आणि अस्खलित मराठी भाषेत संवाद साधत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या साधेपणाची व मराठीप्रेमाची उपस्थितांकडून विशेष दखल घेण्यात आली.

सामाजिक कार्यकर्ते सुनील उकिर्डे यांनी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नव्या नेतृत्वाकडून सकारात्मक कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली. जिल्ह्याच्या विकासात पोलीस प्रशासनाची भूमिका महत्त्वाची असून, नागरिक आणि पोलीस यांच्यातील समन्वय अधिक बळकट होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी किशोर डोके, बाळासाहेब भागवत, लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब आहेर, संदीप भागवत आदी मित्रपरिवारातील पदाधिकारी उपस्थित होते. नव्या जिल्हा पोलीस प्रमुखांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील पोलीस प्रशासन अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, तालुक्यातील घारगाव येथील हॉटेल निलायम येथील चोरीचा छडा लावणाऱ्या व आरोपींना जेरबंद करणाऱ्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांचा व त्यांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या टीमचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

# सण शांततेत, सामाजिक सलोखा राखून साजरे करा- जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया



अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)- बकरी ईद हा सण धार्मिक परंपरा आणि सामाजिक सलोखा राखून, शांततामय वातावरणात साजरा करण्यात यावा. शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करत सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून दक्षतेने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता समिती व प्राणी क्लेश प्रतिबंधक जिल्हास्तरीय समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

बैठकीस महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त उमेश पाटील, सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. मुकुंद राजळे, अन्न व औषध निरीक्षक जी. बी. भोर, यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, सण उत्साहात साजरा करताना कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होणार नाही, याची सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे. प्राण्यांच्या वाहतुकीदरम्यान तसेच कत्तलीच्या प्रक्रियेदरम्यान प्राणी क्लेश प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन होणार नाही, यासाठी संबंधित यंत्रणांनी विशेष दक्षता घ्यावी. विनापरवाना जनावरांची वाहतूक, सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत कत्तल तसेच अस्वच्छता होणार नाही, यासाठी संबंधित विभागांनी संयुक्तपणे कार्यवाही करावी. बकरी ईदच्या निमित्ताने काही तालुक्यांमध्ये तात्पुरत्या कत्तलखान्यांची मागणी होऊ शकते. त्या अनुषंगाने आवश्यक परवानग्या, स्वच्छता आणि नियमांचे पालन याकडे विशेष लक्ष द्यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

कत्तलखाने तसेच इतर ठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावून परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा. स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणीय बाबींकडे दुर्लक्ष होणार नाही, याची दक्षता घ्यावी. नागरिकांच्या भावना, धार्मिक परंपरा आणि सार्वजनिक आरोग्य यामध्ये समतोल राखत प्रशासनाने संवेदनशीलतेने कार्य करावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा- अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५४३/२०२६ दिनांक - ०८/०५/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. शेख इस्माईल इब्राहीम रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक १०/०४/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे शेख इस्माईल शेख इब्राहीम यांचा जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक २०/०४/१९७९ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

# अवैध वाळू वाहतूक...

पान नं. ०३ वरुन-

असता एक पिकअप गाडी येताना दिसली. पथकाने तिला थांबवून चालकास ताब्यात घेवून नाव विचारले असता शुभम संजय जेडगुले (वय २५, रा. वेल्हाळे, ता. संगमनेर) असे सांगितले. त्याला पिकअप मालकाबाबत विचारपूस केली असता शरद कारभारी गुंजाळ याचा असल्याचे सांगितले. त्याच्याकडून १० हजार रुपये किमतीची १ ब्रास वाळू, ३ लाख रुपये किमतीचा पिकअप असा एकूण ३ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. वरील दोन्ही आरोपींविरुध्द संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शहर पोलीस करीत आहे.


धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५


# चंदनेश्वर विद्यालयाच्या ५४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे चंदनेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. या परीक्षेत ५४ विद्यार्थी पात्र ठरले, असून त्यामध्ये इयत्ता पाचवीचे ३८, तर इयत्ता आठवीचे १६ विद्यार्थी यशस्वी झाले. विद्यार्थ्यांच्या उज्वल यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा प्रचिती झाली. चंदनापुरी परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

यश विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रम, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे शक्य झाले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, रजिस्ट्रार, जनता शिक्षण प्रसारक मंडळातर्फे अभिनंदन करण्यात आले.

# राज्यातील आमदारांकडे ३१६ किलो सोने



मुंबई (प्रतिनिधी)- राज्यातील २८८ आमदारांकडे तब्बल ३१६ किलो सोने असून, त्याची एकूण किंमत ५ हजार १८३ कोटी रुपये इतकी आहे. यापैकी ४ हजार ९२४ कोटी रुपयांचे २२६ किलो सोने सत्ताधारी पक्षांच्या आमदारांकडे असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, भाजपच्या आमदारांकडे सर्वाधिक १४७ किलो सोने असून, ते एकूण सोन्याच्या साठ्याच्या ४७ टक्के आहे. शिंदेसेनेकडे ४४ किलो, तर राष्ट्रवादीच्या आमदारांकडे ३३ किलो सोने असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

चांदीच्या साठ्यातही सत्ताधारी आमदारांचेच वर्चस्व दिसून येत आहे. राज्यातील आमदारांकडील एकूण चांदीपैकी ९१ टक्के चांदी सत्ताधारी आमदारांकडे आहे. त्यात भाजप आमदारांकडे ८१ टक्के, शिंदेसेनेकडे २ टक्के, तर राष्ट्रवादीच्या आमदारांकडे ८ टक्के चांदी असल्याचे समोर आले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर्षभर सोने खरेदी न करण्याचे आवाहन केल्यानंतर 'दिव्य मराठी'ने राज्यातील २८८ आमदारांनी २०१९ आणि २०२४ च्या निवडणुकीत सादर केलेल्या ५७६ प्रतिज्ञापत्रांची पडताळणी केली. या पडताळणीत २०१९ च्या तुलनेत २०२४ मध्ये आमदारांकडील सोन्यात तब्बल ९१ किलोची वाढ झाल्याचे स्पष्ट झाले.

२०१९ मध्ये सत्ताधारी आमदारांकडे १८२.६ किलो सोने होते. ते २०२४ मध्ये वाढून २२५.८ किलोपर्यंत पोहोचले आहे. विरोधी पक्षांच्या आमदारांकडील सोनेही ४२.४ किलोवरून ८५.४ किलोपर्यंत वाढले आहे. चांदीच्या साठ्यातही मोठी वाढ झाली आहे. सत्ताधारी आमदारांकडील चांदीचा साठा ६६४.७ किलोवरून थेट १ हजार ४१४.३ किलोपर्यंत वाढला असून, ही वाढ १०० टक्क्यांहून अधिक असल्याचे दिसून आले आहे.








पाहिजेत
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

पाहिजेत
स्वयंपाकीन - ०१ (२ व्यक्तींचा स्वयंपाक)
ड्रायव्हर - ०१
क्लार्क - ०१ (लेडीज/जेन्ट्स)
वॉचमन - ०१
अनुभवास प्राधान्य
9822334431

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

# निवडणुकीनंतर 'लाडकी बहीण' योजनेतून पात्र महिलाही वगळल्या ?

## उत्कर्षा रुपवते यांचा सरकारवर फसवणूकीचा आरोप

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- विधानसभा निवडणुकीपूर्वी मोठ्या गाजावाजात सुरू करण्यात आलेल्या *'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'*वरून राज्यात पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले आहे. निवडणुकीत महिलांची मते मिळवण्यासाठी योजना राबवली आणि आता निवडणूक संपताच पात्र महिलांनाच योजनेतून बाहेर काढले जात असल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांनी केला आहे.

त्यांनी म्हटले की, सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही सखोल पडताळणी न करता महिलांचे अर्ज मंजूर करण्यात आले आणि त्यांच्या खात्यात दरमहा १,५०० रुपयांचा लाभ जमा करण्यात आला. मात्र निवडणूक पार पडताच ई-केवायसी आणि इतर तांत्रिक निकष अनिवार्य करण्यात आले. या प्रक्रियेमुळे अनेक पात्र महिलांचे अर्ज बाद होत असून, लाखो महिलांना योजनेबाहेर काढले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.



रुपवते यांनी सांगितले की, सुरुवातीला या योजनेचा लाभ सुमारे २.६ कोटी महिलांना मिळत होता. मात्र त्यानंतरच्या प्रक्रियेत हा आकडा १.७६ कोटींवर आला असून जवळपास ८० लाख महिलांना लाभातून वगळण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. यात कष्टकरी, शेतकरी, मागासवर्गीय तसेच विविध जाती-जमातीतील महिलांचा मोठा समावेश असल्याचे त्यांनी नमूद केले.

अनेक महिलांकडे आवश्यक कागदपत्रे नसल्याने त्यांना या प्रक्रियेचा मोठा फटका बसत आहे. हा केवळ लाभ कमी करण्याचा मुद्दा नाही, तर राज्यातील लाखो महिलांच्या विश्वासाशी खेळण्याचा प्रकार आहे, अशी टीका त्यांनी केली.

याशिवाय त्यांनी असा आरोपही केला की, या योजनेसाठी इतर कल्याणकारी विभागांचा निधी वळवला जात आहे. त्यामुळे शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण विभागांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांवर परिणाम होत आहे. विशेषतः शिष्यवृत्ती, घरकुल योजना, राखीव निधी तसेच बार्टी आणि सारथीसारख्या संस्थांवर याचा विपरीत परिणाम होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, लाडकी बहीण योजना बंद करण्याची आमची भूमिका नाही; मात्र इतर महत्त्वाच्या योजनांचा बळी देऊन ही योजना राबवली जाऊ नये, असेही उत्कर्षा रुपवते यांनी स्पष्ट केले.

# माजी मंत्री थोरातांकडून तिगाव येथील सानप कुटुंबीयांचे सांत्वन

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- तिगाव येथील दगडाच्या खाणीत पोहण्यासाठी गेलेल्या महेश गोरखनाथ सानप व ओंकार गोरखनाथ सानप यांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण तालुक्यात हळहळ निर्माण झाली असून, सानप कुटुंबीयांचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी तिगाव येथे जाऊन सांत्वन केले. त्याचबरोबर या कुटुंबाला जास्तीत जास्त मदत मिळून देण्याच्या प्रशासनाला सूचना केल्या. मयत महेश व ओमकार सानप यांच्या मातोश्री मनीषा सानप व कुटुंबीयांची बाळासाहेब थोरात यांनी तिगाव येथे जाऊन भेट घेत सांत्वन केले. यावेळी सरपंच ज्ञानेश्वर सानप, शेतकी संघाचे संचालक सचिन दिघे, डॉ. संदीप गोरडे, अनिल कांदळकर, वाल्मीक सानप, छबुराव सानप, नामदेव सानप, प्रभाकर कांदळकर, प्रकाश सानप, संजय सानप, योगेश सानप, विशाल सानप आदींसह गावातील नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.



शुक्रवारी दुपारी तिगाव येथील दगडाच्या खाणीत पोहण्यासाठी गेलेल्या महेश गोरखनाथ सानप (वय १८) व ओमकार गोरखनाथ सानप (वय १४) या दोन भावांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. मागील एक वर्षांपूर्वी या मुलांच्या वडिलांचे दुःखद निधन झाले होते. शुक्रवारी घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे तालुक्यात हळहळ व्यक्त झाली.

# पेट्रोल-सीएनजी रिक्षांचे होणार ई-रिक्षात रूपांतर

मुंबई (प्रतिनिधी)- पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन व गॅसच्या वाढत्या दरांचा फटका सर्वसामान्यांसह रिक्षा चालकांनाही बसत असून, त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने जुन्या पेट्रोल आणि सीएनजी रिक्षांचे पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक रिक्षामध्ये रूपांतर करण्याच्या प्रस्तावावर गांभीर्याने विचार सुरू केला आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या अभिनव उपक्रमाची माहिती दिली. मंत्रालयात शुक्रवारी जुन्या रिक्षांचे इलेक्ट्रिक रिक्षांमध्ये रूपांतर आणि ईव्ही चार्जिंग सुविधा उभारणीसंदर्भात महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर, सहआयुक्त संदेश चव्हाण, महानगर गॅसचे मुख्य व्यवस्थापक मुकेश पन्होत्रा, मुख्य वित्त अधिकारी राजेश पटेल, श्री ईव्ही इंडस्ट्रीजचे संचालक करण कडाबा, सल्लागार महेश कडाबा, एक्सपोनंट एनर्जीचे अक्षत मोदी आणि इको सिस्टमचे इशांत मजबूदार उपस्थित होते.



यावेळी प्रताप सरनाईक म्हणाले की, पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक रिक्षा ही आता शहरी भागाची गरज बनली आहे. ईव्ही पॉलिसी धोरणानुसार राज्यात मोठ्या प्रमाणावर ईव्ही वाहने रस्त्यावर आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. राज्यातील विद्यमान रिक्षांची माहिती घेऊन टप्प्याटप्प्याने या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. चार ईव्ही कंपन्यांना समान संधी देण्याची भूमिका शासनाची असून, रिक्षा चालकांना परवडतील अशा किमतीत ईव्ही रिक्षा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी कंपन्यांना सूचना करण्यात आल्या आहेत.

ईव्ही रिक्षांच्या चार्जिंगसाठी महानगर गॅसच्या जागांचा वापर करण्याबाबतही विचार सुरू आहे. तसेच, परिवहन विभागाकडून अशा रिक्षांना पाच वर्षांसाठी परवाना वाढवून देण्याचाही प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. रिक्षाचालकांना एकरकमी खर्च करणे शक्य नसल्याने चार्जिंग आणि किटसाठी दररोज पैसे भरण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही संबंधित कंपन्यांना देण्यात आल्या आहेत. पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे इंधन आणि सीएनजीचे दर सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे रिक्षाचालकांच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर जुन्या रिक्षांचे पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक रिक्षांमध्ये रूपांतर केल्यास इंधन खर्चात मोठी बचत होऊन चालकांना आर्थिक दिलासा मिळेल, असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला.

दरम्यान, श्री ईव्ही इंडस्ट्रीजचे संचालक करण कडाबा यांनी सादरीकरणाद्वारे कंपनीच्या प्रकल्पाची माहिती दिली. श्री ईव्ही आणि महानगर गॅस यांच्यात दोन वर्षांपूर्वी सामंजस्य करार करण्यात आला असून, आतापर्यंत ४४७ जुन्या रिक्षांचे इलेक्ट्रिक रिक्षांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. या रिक्षांमधील बॅटरीला पाच वर्षांची वॉरंटी देण्यात येत असून, एका चार्जमध्ये सुमारे १४० किलोमीटर मायलेज मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. या रूपांतरणासाठी सुमारे दोन लाख रुपयांचा खर्च येत असला, तरी इंधन आणि सीएनजी बचतीमुळे रिक्षा मालकांची वर्षाला ५५ ते ७५ हजार रुपयांपर्यंत बचत होत असल्याचा दावा त्यांनी केला. पहिल्या टप्प्यात मुंबई महानगर क्षेत्र, पुणे, नाशिक आणि नागपूर येथे ही योजना राबविण्यात येणार असून, दुसऱ्या टप्प्यात संपूर्ण राज्यभर दोन लाख रिक्षांचे रूपांतर करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. मुंबईला 'रिट्रीफिट कॅपिटल' बनवण्याचाही मानस कंपनीने व्यक्त केला आहे.

# वनविभागाने पकडला लाकडाचा साठा

## घुलेवाडी फाटा येथे कारवाई

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- विनापरवाना वृक्षतोड करून अनधिकृतपणे वाहतूक करण्यात येणारा लाकूड साठा वन विभागाने धाडसी कारवाईत जप्त केला असून, दोन पिकअप वाहनेही ताब्यात घेतली आहेत. ही कारवाई गुरुवारी (दि. २१) घुलेवाडी फाटा येथे करण्यात आली.

वन विभागाला निमोण येथून दोन वाहनांमधून विनापरवाना लाकूड साठा संगमनेरकडे आणला जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी, संगमनेर भाग-२, नम्रता हिरे यांनी उपवनसंरक्षक, अहिल्यानगर तसेच विभागीय वन अधिकारी (दक्षता), नाशिक यांना माहिती देऊन कारवाईचे नियोजन केले. सहाय्यक वनसंरक्षक अमरजीत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचण्यात आला.


घुलेवाडी फाटा येथे वाहनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये पिकअप (क्र. एमएच. १५, बीजे. ९१६४) व दुसरा पिकअप (क्र. एमएच. १५, बीजे. १५५३) ही वाहने अडविण्यात आली. पहिल्या वाहनावरील आरोपी फैजान इस्माईल अत्तार (वय २७, रा. निमोण), तर दुसऱ्या वाहनावरील आरोपी इस्तीयाक मुस्ताक अत्तार (वय ३८, रा. निमोण) यांच्याकडे लाकूडतोड व वाहतूक परवान्याची मागणी करण्यात आली. मात्र, संबंधितांकडे कोणतेही वैध परवाने नसल्याचे तपासणीत निष्पन्न झाले.

यानंतर वन विभागाने वन अपराध नोंदवून दोन्ही वाहने व त्यातील लाकूड साठा जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या लाकूड मालामध्ये निंब व महारुख या वृक्षांचे लाकूड असल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. संबंधित वृक्षांची विनापरवानगी तोड करून अनधिकृत वाहतूक करण्यात आल्याचा प्राथमिक निष्कर्ष तपासातून समोर आला आहे.

या कारवाईत वनपरिक्षेत्र अधिकारी नम्रता हिरे, वनपाल वाय. आर. परते, वनरक्षक एस. एम. पारधी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला. पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली चौकशी अधिकाऱ्यांमार्फत सुरू आहे.

# ड्रोनच्या सहाय्याने प्रभागाचा डिजिटल नकाशा तयार

## जनगणना कार्यात डॉ. बागुल यांचा अभिनव उपक्रम



अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)- भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या डिजिटल जनगणना उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात जनगणनेच्या पूर्वतयारीचे काम वेगाने सुरू आहे. याच अंतर्गत प्रगणक म्हणून कार्यरत असलेले शिक्षक डॉ. अमोल बागुल यांनी आपल्या कार्यक्षेत्रात तंत्रज्ञानाधिष्ठित अभिनव उपक्रम राबविला आहे.

त्यांना नेमून दिलेल्या प्रभागाचा अचूक व अद्ययावत नकाशा तयार करण्यासाठी त्यांनी आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर केला. ड्रोनद्वारे संपूर्ण परिसराचे हवाई छायाचित्रण करण्यात आले. त्याच्या आधारे प्रभागातील रस्ते, घरे, गल्ल्या, प्रमुख ठिकाणे तसेच भौगोलिक रचना यांचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले. या माहितीच्या आधारे जनगणना कार्यासाठी उपयुक्त असा अचूक व अद्ययावत नकाशा तयार करण्यात आला.

याप्रसंगी आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे घरांची अचूक नोंद, क्षेत्रनिहाय नियोजन तसेच घरभेटी घेणे अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे जनगणना प्रक्रियेतील अचूकता वाढण्यास मोठी मदत होईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनगणना कार्य अधिक प्रभावी करण्याचा हा प्रयत्न इतर प्रगणकांसाठीही प्रेरणादायी ठरत असून, अशा उपक्रमांमुळे प्रशासनाच्या कामकाजात अधिक परिणामकारकता येईल. यावेळी सहायक आयुक्त मेहेर लहारे, प्रभाग अधिकारी बाळासाहेब पवार, मास्टर ट्रेनर डॉ. संतोष देशमुख, रफिक देशमुख, पर्यवेक्षक अलका दहातोंडे, प्रगणक व कर्मचारी उपस्थित होते.

याविषयी बोलताना डॉ. बागुल यांनी सांगितले की, जनगणना ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय प्रक्रिया आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास हे कार्य अधिक अचूक, सुलभ आणि परिणामकारक होऊ शकते. त्याच उद्देशाने ड्रोनच्या साहाय्याने नकाशा तयार करण्याचा हा प्रयत्न करण्यात आला. अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रातील या नाविन्यपूर्ण उपक्रमाची नागरिकांसह शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रात चर्चा सुरू असून, डिजिटल भारताच्या दिशेने टाकलेले प्रभावी पाऊल म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

# बाजारीकरणाच्या गर्तेत अडकलेली शिक्षण व्यवस्था...

'नीट' परीक्षेच्या पेपरफुटीमुळे संपूर्ण देशामध्ये जो प्रचंड गदारोळ चालू आहे, कमालीची अस्वस्थता पसरली आहे, त्याने आपल्या देशातील शिक्षण व्यवस्थेचे अत्यंत विदारक चित्र समाजासमोर आणले आहे. लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य, त्यांच्या पालकांची स्वप्ने या घोटाळ्यांमुळे एका रात्रीत धुळीस मिळाली आहेत. या संपूर्ण प्रकरणातून पुढे आलेली सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, ज्या शिक्षकांवर समाज घडवण्याची, विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याची जबाबदारी असते, त्याच कोचिंग क्लासेसमधील शिक्षकांचा या गैरप्रकारांमधील थेट सहभाग. परीक्षा घेणाऱ्या केंद्रीय संस्था, कोचिंग क्लासेसचे चालक, मध्यस्थ यांच्यामधील परस्परांचे एकमेकांशी असलेले साटेलोटे आता उघड होत आहेत. पैशाच्या अमिषाने विकले गेलेले प्रश्न, स्वतःच्या कोचिंग क्लासेसमधील विद्यार्थ्यांना हमखास यश मिळवून देण्यासाठी केलेली संभाव्य प्रश्नांची पूर्वतयारी, या सगळ्याच्या मुळाशी केवळ आणि केवळ कोचिंग क्लासेसची, त्यांच्या चालकांची अफाट पैशांची भूक दडलेली आहे.

आजच्या अत्यंत स्पर्धात्मक युगात आपल्या मुलाला स्पर्धा परीक्षांमध्ये, मग ती 'नीट' असो, 'जेईई' असो वा 'सीईटी', उत्तम गुण मिळवून चांगल्या नामांकित विद्यापीठांमध्ये किंवा कॉलेजेसमध्ये प्रवेश मिळावा, ही प्रत्येक पालकाची प्रामाणिक इच्छा असते. आपली मुलं मागे पडू नयेत म्हणून पालक कर्ज काढून, स्वतःच्या गरजांना मुरड घालून लाखो रुपये या कोचिंग क्लासेसना मोजतात. या पालकांच्या मानसिकतेचा गैरफायदा घेत गेल्या काही वर्षांत, दोन-तीन दशकात शिक्षण क्षेत्रात एक नवीनच 'व्यापारी संस्कृती' उदयाला आली आहे. अनेक नामांकित कॉलेजेसनी या कोचिंग क्लासेससोबत अंतर्गत हातमिळवणी (संगनमत) करून 'इंटिग्रेटेड कोर्सेस' सुरू केले आहेत, जिथे कॉलेजमध्ये न जाता थेट कोचिंग क्लासेसमध्येच हजेरी लावली जाते. तसे पाहिले तर, आजकाल पालक आपल्या मुलांच्या शिक्षणावर अगदी 'केजी' (बालवाडी) पासूनच लाखो रुपये खर्च करायला सुरुवात करतात. पुढे शाळा, हायस्कूल, उच्च शिक्षण पूर्ण होईपर्यंत हा खर्च करोडोंच्या घरात पोहोचलेला असतो. यामागे पालकांचा एकच उद्देश असतो की, मुलाने इंजिनिअरिंग, मेडिकल, आर्किटेक्चर किंवा व्यवस्थापन (मॅनेजमेंट) यांसारख्या उच्च क्षेत्रात करिअर करावे आणि बक्कळ पैसा कमवावा.

बाजारपेठेच्या नियमाप्रमाणे जेव्हा पालकांकडून शिक्षणात एवढी मोठी आर्थिक गुंतवणूक होते, तेव्हा साहजिकच ही गुंतवणूक लवकरात लवकर कशी परत मिळेल, म्हणजेच 'रिटर्न ऑन इन्व्हेस्टमेंट' कसा साधता येईल, यावरच विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे विचारचक्र सुरू होते. समाज घडवण्याच्या पवित्र उद्देशाऐवजी शिक्षणाकडे जेव्हा केवळ एक आर्थिक गुंतवणूक म्हणून




पाहिले जाते, तेव्हाच नैतिकतेचा बळी जातो. उच्च शिक्षण पूर्ण करून करिअर सुरू झाल्यानंतर मिळणारा पगार सर्वांनाच लाखो-करोडो रुपयांमध्ये नसतो, हे आजचे कटू वास्तव आहे. संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांचा विचार केला, तर केवळ एक किंवा दोन टक्के विद्यार्थ्यांनाच अशा प्रचंड पगाराच्या नोकऱ्या मिळतात. उर्वरित मध्यमवर्गीय किंवा सर्वसामान्य मुलांना, ते डॉक्टर किंवा इंजिनिअर झाले तरी, सुरुवातीला अपेक्षेप्रमाणे पगार मिळत नाही. इथेच मुलांच्या मानसिकतेवर प्रचंड ताण येतो. गुंतवलेला पैसा झटपट वसूल करण्यासाठी मग 'शॉर्टकट' शोधण्याचे विचारचक्र सुरू होते. यातूनच पुढे वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात 'कट प्रॅक्टिसेस', 'कट मनी', अनैतिक मार्गाने पैसा कमवण्याच्या प्रवृत्ती बळावतात.

जेव्हा शिक्षणाचा उद्देश केवळ गुंतवणूक आणि परतावा 'रिटर्न ऑन इन्व्हेस्टमेंट' असा होतो तेव्हा समाज घडवण्याची प्रक्रिया थांबते आणि तेथूनच नैतिक अधोगतीची सुरुवात होते हे गंभीर वास्तव आहे.

आपली सामाजिक मूल्ये किती वेगाने ढासळत चाललेली आहेत याचे मूळ आजच्या बाजारीकरण झालेल्या शिक्षण पद्धतीत स्पष्ट दिसते. याला आणखी खतपाणी घालण्याचे काम सोशल मीडिया, ओटीटी प्लॅटफॉर्म्स करत आहेत. या माध्यमांवरून सातत्याने दाखवली जाणारी विविध प्रलोभने, आलिशान व छानछोकीची जीवनशैली, खोट्या प्रतिष्ठेचा देखावा तरुणाईला भुरळ पाडत आहे. ही श्रीमंती, चकचकाट आपल्याही आयुष्यात असावा, यासाठी अफाट पैशांची गरज भासते. आधीच शिक्षणामध्ये करोडो रुपये खर्च झालेले असल्यामुळे, तो पैसा लवकरात लवकर आणि कोणत्याही मार्गाने कसा मिळवता येईल, या विचारातून लोक वाममार्गाकडे वळतात. ही नीट पेपरफुटीची प्रकरणे याच अनैतिक मानसिकतेचे अपत्य आहेत.

ज्या शिक्षकांकडे पाहून विद्यार्थ्यांनी, समाजाने आदर्श घ्यावा, तेच शिक्षक जर कोणत्याही नैतिकतेचा धरबंध न बाळगता केवळ पैसा कमवण्याच्या उद्दिष्टाने शिक्षण क्षेत्राकडे पाहत असतील, तर हे आपल्या समाजाचे मोठे दुर्दैव आहे. अशा अनैतिक मार्गांचा अवलंब करून आज समाजात काही 'शिक्षण सम्राट' निर्माण झाले आहेत, जे समाजात मोठी (खोटी) प्रतिष्ठा मिरवत वावरत असतात. एकीकडे आपण भारताला जागतिक महासत्ता म्हणून उदयाला आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत. मात्र दुसरीकडे शिक्षण क्षेत्रातील अनैतिकता यासारख्या मूलभूत अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे याची जाणीव शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींना वेळेत व्हायला हवी.

शिक्षण क्षेत्रातील नैतिकता एकदा का घसरू लागली, सर्वसामान्य जनतेचा परीक्षा पद्धतीवरील व एकूणच शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास उडू लागला, तर ते देशाच्या सामाजिक आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरेल. यासाठी सरकारी पातळीवर कठोर कायदे होणे गरजेचे आहेच, पण त्यासोबतच शिक्षण क्षेत्रातील थोर विद्वान, तज्ज्ञ मंडळींनी एकत्र येऊन यावर तातडीने दीर्घकालीन उपाययोजना करणे नितांत गरजेचे आहे. बालवाडीपासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत झालेल्या शिक्षणाच्या या बाजारीकरणाला वेळीच वेसण घालण्याची गरज आहे. शिक्षणामुळेच समाज घडतो, म्हणूनच शालेय स्तरावर, प्रत्येक घराघरामध्ये पालक व शिक्षकांनी मुलांना लहानपणापासूनच मूल्यांची, नैतिकतेची शिकवण दिली पाहिजे. केवळ गुणांच्या शर्यतीत धावणारे, पैशाच्या मागे लागणारे रोबोट तयार करण्यापेक्षा, नैतिक मूल्यांची जपणूक करणारा संवेदनशील नागरिक घडवणे हेच या समस्येवरील खरे उत्तर आहे. तरच भविष्यात एका सुदृढ, सशक्त, प्रामाणिक समाजाची निर्मिती शक्य होईल.

– सुहास बेलापूरकर
मुंबई
मो. ९८९२५१६८१०





दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com










# संगमनेरच्या शेतकऱ्यांचा इशारा

## २९ मे पर्यंत पीकविमा द्या, अन्यथा बेमुदत ठिय्या आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पीकविमाधारक शेतकऱ्यांना सन २०२५ च्या खरीप हंगामातील पीकविमा नुकसान भरपाई २९ मेपर्यंत देण्यात यावी, अन्यथा संगमनेर तालुका कृषी अधिकारी यांच्या दालनात बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकरी संघटना संगमनेर आणि तालुक्यातील पीकविमाधारक शेतकऱ्यांनी दिला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी आणि कृषी प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले आहे.

शेतकरी संघटनेच्या निवेदनानुसार, सन २०२५ च्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे राज्यभरातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने विविध भागातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी नुकसान भरपाई दिली आहे. मात्र, अहिल्यानगर जिल्ह्यातील इतर सर्व तालुक्यांना पीकविमा नुकसान भरपाई मिळालेली असताना संगमनेर तालुक्यातील शेतकरी मात्र या मदतीपासून वंचित राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शेतकरी संघटनेने प्रशासनावर गंभीर आरोप करत म्हटले आहे की, महसूल व कृषी विभागाने अंतिम पीक कापणी अहवाल तयार करताना प्रत्यक्ष शेतपातळीवर जाऊन पंचनामे करण्याऐवजी हलगर्जीपणे काम केले. परिणामी उंबरठा उत्पादनाचे आकडे वास्तवापेक्षा अधिक दाखविण्यात आले. प्रत्यक्षात संगमनेर तालुक्यातील अनेक भागात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. जर शेतात जाऊन वस्तुनिष्ठ पाहणी करण्यात आली असती, तर उत्पादनातील घट स्पष्ट झाली असती आणि शेतकऱ्यांना पीकविमा लाभ मिळाला असता, असा दावा करण्यात आला आहे.

नगर जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये कमी उंबरठा उत्पादनाच्या आधारे नुकसान भरपाई मंजूर झाली असताना केवळ संगमनेर तालुक्यात वेगळी आकडेवारी दाखवून शेतकऱ्यांवर अन्याय करण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. यापूर्वी ११ मे रोजी शेतकरी संघटना अहिल्यानगरच्या वतीने जिल्हाधिकारी पंकज आशिया आणि जिल्हा कृषी अधीक्षक सुधाकर बोराळे यांना निवेदन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रांताधिकारी अरुण उंडे यांच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले आहे.

या निवेदनात २९ मेपर्यंत संगमनेर तालुक्यातील पीकविमाधारक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसान भरपाई जमा करण्यात यावी, अन्यथा शेतकरी संघटना आणि तालुक्यातील शेतकरी संगमनेर तालुका कृषी अधिकारी कार्यालयात बेमुदत ठिय्या आंदोलन छेडून न्यायासाठी लढा उभारतील, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. निवेदन देताना शेतकरी संघटना संगमनेर तालुका अध्यक्ष रमेश शिंगोटे, जिल्हाध्यक्ष नीलेश शेडगे, उपाध्यक्ष नवनाथ दिघे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सुनीताताई वानखेडे, बाळासाहेब घोगरे, सोमेश्वर साबळे, गणपत फटांगरे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयातील डॉ. थोरातांवर निलंबनाची मागणी

## आमदार खताळ यांचे आरोग्य मंत्र्यांना निवेदन

युवावार्ता (प्रतिनिधी)

घुलेवाडी -संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत थोरात यांच्या कथित मनमानी कारभाराविरोधात संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांनी थेट राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून त्यांच्या निलंबनाची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे आरोग्य विभागात मोठी खळबळ उडाली असून, तालुक्यातही विविध स्तरांतून चर्चेला उधाण आले आहे.

आमदार खताळ यांनी आपल्या निवेदनात गंभीर स्वरूपाचे आरोप करत म्हटले आहे की मूळचे कर्नाटक येथील रहिवासी असलेले स्वर्गीय सिद्धार्थ नितीन कुमार यांचा त्यांच्या राहत्या घरी मृत्यू झाला होता. मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्यासाठी शवविच्छेदन आवश्यक होते. त्यासाठी मृतकाच्या नातेवाईकांनी घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयातील ऑन-ड्युटी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत थोरात यांच्याकडे वारंवार विनंती केली. मात्र, त्यांनी शवविच्छेदन करण्यास स्पष्ट नकार दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेतील सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे, तब्बल ३६ तास मृतदेह शासकीय रुग्णालयात पडून राहिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निर्देश दिल्यानंतरही डॉ. थोरात यांनी आदेशांचे पालन केले नसल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकारामुळे मृतकाच्या नातेवाईकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागल्याचेही आमदार खताळ यांनी नमूद केले आहे.

या घटनेबाबत विविध माध्यमांतून सविस्तर बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यानंतर संबंधित वृत्तांकनाचा राग मनात धरून डॉ. थोरात यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी न घेता थेट एका वृत्तपत्राचे संपादक आणि कार्यकारी संपादक यांच्या विरोधात संगमनेर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. यामुळे लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या प्रसारमाध्यमांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

आ. खताळ यांनी पुढे म्हटले आहे की, डॉ. थोरात यांच्याकडून रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांशी उद्धट व अरेरावीची भाषा वापरली जाते. तसेच वाद निर्माण झाल्यास संबंधित व्यक्तींना थेट ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत कारवाईची धमकी दिली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यांच्या या कथित वर्तणुकीमुळे रुग्णालयातील काही कर्मचारी आणि अधिकारीही दबावाखाली काम करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून डॉ. प्रशांत थोरात यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी आरोग्यमंत्र्यांकडे केली आहे.























दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25